75

ISSN No.: 2249-9792

# Contemporary Issues in Languages and Humanities

CILH

- Special Issue on -

**Research Methodology In Humanities**

Vol-IX Special Issue - 1 February - 2020

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | डॉ. सुनील पं. उगले | सामाजिक संशोधन - महत्व, वैशिष्टे आणि आवश्यकता | 81 |
| 18 | डॉ. राजेंद्र अ. रसाळ | उद्योग-व्यवसायाच्या उभारणीत संशोधनाचे उपयोजन | 87 |
| 19 | डॉ. प्रल्हाद दत्तात्रय दुधाने | संशोधन आणि अनुसूची | 94 |
| 20 | श्रीमती वर्षा दिनकर पाटील<br>डॉ. साहेबराव त्रंबकराव भुकन | संशोधनात साहित्य आढाव्याचे महत्व | 101 |
| 21 | डॉ. संजय जिभाऊ पाटिल<br>पवार वर्षा नारायण | मानवी जीवनातील समस्या सोडविण्यासाठी संशोधनाची आवश्यकता | 105 |
| 22 | डॉ. शिवाजी दत्तात्रय थोरे | जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यावसायिक संशोधन करणे एक काळाची गरज | 114 |
| 23 | नाना एस. चव्हाण | सामाजिक संशोधनात नमुना निवडीचे फायदे | 117 |
| 24 | बाळासाहेब रघुनाथ चकोर | भूगोलशास्त्राचे अध्यापन तंत्र व पद्धती अभ्यासणे | 125 |
| 25 | अविनाश अशोक सोनवणे | Research Design and Approach in Humanities | 131 |
| 26 | कृष्णा पंढरीनाथ सांगळे | सामाजिक संशोधनामध्ये मुलाखत तंत्राची उपयुक्तता अभ्यासणे | 134 |
| 27 | गोविंद बारकू ठाकरे | संशोधनातील संगणकाचे योगदान | 140 |
| 28 | पूनम प्रकाश वाघ | भाषा व साहित्य संशोधन प्रक्रिया | 144 |
| 29 | ज्ञानेश्वर केदु मातेरे | सामाजिक संशोधनाचे महत्व व मर्यादा अभ्यासने | 149 |
| 30 | मुकुंद अंबादास आहेर | व्यवसाय व्यवस्थापनातील संशोधनाची उपयुक्तता अभ्यासणे | 152 |
| 31 | कृष्णा बुवाजी कांबळे | संशोधन पद्धतीत मुलाखत तंत्राचे फायदे | 159 |
| 32 | आंबेकर ए.एच. | ऐतिहासिक संशोधनाच्या पद्धती | 162 |
| 33 | मुंढे सविता एकनाथ | हिंदी साहित्य में अनुसंधान के विविध आयाम | 169 |




Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.

# उद्योग-व्यवसायाच्या उभारणीत संशोधनाचे उपयोजन

डॉ. राजेंद्र अ. रसाळ
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुखसीएसएम आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
चाकण, ता.खेड, जि. पुणे.

संशोधन ही गुंतागुंताची प्रक्रिया आहे. संशोधनाच्या माध्यमातून नवीन ज्ञान मिळविण्याचा सुव्यवस्थित प्रयत्न केला जातो. माहिती किंवा आधारसामग्री गोळा करण्याच्या बाबतीत संशोधनाची मदत होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अशा सर्वच क्षेत्रात संशोधनाचा उपयोग होतो. प्रस्तुत अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट उद्योग-व्यवसायाचा शोध, उभारणी आणि विस्ताराच्या बाबतीतील संशोधनाची उपयुक्तता स्पष्ट करणे हे आहे. प्रस्तुत शोधनिबंधाची विभागणी पाच भागात केली आहे. पहिल्या भागात संशोधनाचा अर्थ स्पष्ट केला आहे. दुसऱ्या भागात उद्योग-व्यवसायाच्या संधी व संशोधन आणि तिसऱ्या भागात उद्योग-व्यवसायाची उभारणी व संशोधन याविषयी माहिती दिली आहे. चौथ्या भागात उद्योग-व्यवसायाचा विस्तार आणि संशोधन याविषयी आणि पाचव्या भागात उद्योग-व्यवसायातील समस्या व संशोधन याविषयी स्पष्टीकरण दिले आहे.

## १. संशोधनाचा अर्थ:

संशोधन म्हणजे नवीन तथ्य शोधण्यासाठी हाती घेतलेली व्यवस्थित अशी रचना होय. ते निर्णय घेण्याची रचना उपलब्ध करते. संशोधन ही समस्या सोडविण्याची प्रक्रिया असून ती त्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा आधार घेते. सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात संशोधनाचे स्थान महत्वाचे आहे.

रेडमन आणि मोरी यांच्या मते, “संशोधन हा नवीन ज्ञान मिळविण्याचा सुव्यवस्थित प्रयत्न आहे.”

जॉन बेस्ट यांच्या मते, “संशोधन हा ज्ञानाच्या संबंधित भागाचा शोध व विकास या दिशेने असलेला पद्धतशीर कार्यक्रम होय.”



Vol. IX Special Issue No. 1 February 2020 ISSN No-2249-9792

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

संशोधनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. संशोधन हे समस्येपासून सुरु होते आणि ते समस्या सोडविण्याच्या दिशेने जाते. संशोधन प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न करू शकते.

२. संशोधनासाठी विचारपूर्वक केलेल्या योजनेची आवश्यकता असते.

३. संशोधन अनुभवनिष्ट पुराव्यावर आधारित असते.

४. माहिती नसलेल्या बाबी माहिती करून घेण्याचा भक्कम निर्धार संशोधनासाठी आवश्यक असतो.

५. संशोधन वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचा किंवा मांडण्याचा प्रयत्न करते.

६. संशोधनासाठी अचूक निरीक्षणाची आवश्यकता असते.

७. संशोधन हे घाईघाईने करावयाचे कार्य नाही.

८. संशोधन ही वस्तुस्थिती शोधण्यासाठी काळजीपूर्वक केली जाणारी चौकशी होय.

९. संशोधनात समस्येचे संभाव्य उत्तर म्हणून परिकल्पना मांडली जाते.

१०. संशोधनासाठी व्यवस्था किंवा पद्धतीची गरज असते.

संशोधनाचे विविध प्रकार आहे. उपयोजित संशोधन, प्रायोगिक संशोधन, वर्णनात्मक संशोधन, सर्वेक्षणात्मक संशोधन, गुणात्मक संशोधन, समन्वेशात्मक संशोधन, शुद्ध संशोधन, मूल्यमापन संशोधन, संख्यात्मक संशोधन, ऐतिहासिक संशोधन हे त्यापैकीच काही प्रकार आहेत.

वर्णनात्मक संशोधन अस्तित्वात असलेल्या स्थितीचे स्पष्टीकरण, नोंद व विश्लेषण करते. उदा. समजा साबणाच्या कंपनीस तिची विक्री घटत जात असलेली दिसून आली. बाजाराच्या प्रत्याभरणाच्या आधारे कंपनी साबणापेक्षा पावडर अधिक पसंत केली जाते अशी परिकल्पना मांडू शकते. या परिकाल्पनेची चाचणी घेण्यासाठी वर्णनात्मक अभ्यास हाती घेतला जाऊ शकतो. त्यातून वस्तूची विक्री कमी का होत आहे याची कारणे शोधता येतात.

प्रायोगिक संशोधनात मुख्य भर हा चलांमधील संबंध शोधण्यावर असतो. इतर काही संबंधित चले स्थिर ठेवून एका चलाचा परिणाम यात अभ्यासला जातो. काही चले काळजीपूर्वक नियंत्रित करून काय दिसून येते ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रायोगिक संशोधन



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed.Dist-Pune.

करते. स्वतंत्र चल आणि परतंत्र चल यातील संबंध म्हणजेच परतंत्र चलावर होणारा स्वतंत्र चलाचा परिणाम या संशोधनाद्वारे शोधला जातो. उदा. कंपनी जाहिरातीवरील खर्चामुळे आपल्या वस्तूच्या मागणीवर काय परिणाम होतो याचा अभ्यास करु शकते. समजा जाहिरातीवरील खर्चामुळे वस्तूची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे कंपनीच्या निदर्शनास आले तर कंपनी जाहिरातीवरील खर्चात वाढ करून आपल्या वस्तूच्या मागणीत वाढ घडवून आणू शकते.

उपयोजित संशोधनाचे ध्येय काही व्यावहारिक समस्यांना उत्तर शोधून काढणे हा आहे. या संशोधनाचा संबंध व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी शास्त्रीय ज्ञान वापरण्याचे मार्ग शोधून काढण्याशी आहे. उपयोजित संशोधन नवीन वस्तुस्थिती पुढे आणू शकते. तसेच ते सिद्धांताची चाचणी घेऊ शकते. उपयोजित संशोधन संकल्पनात्मक स्पष्टीकरणास मदत करते. तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन आणि इतर सामाजिक शास्त्रात उपयोजित संशोधनास मोठा वाव आहे.

सर्वेक्षण संशोधनात जनसंख्येच्या निवडलेल्या नमुन्याकडून प्रत्यक्षपणे माहिती किंवा आधारसामग्री गोळा केली जाते. माहिती किंवा आधारसामग्री निरक्षण, मुलाखती, प्रश्नावली यादवारे गोळा केली जाते. आर्थिक सर्वेक्षणात लोकांची आर्थिक स्थिती, आर्थिक प्रणालीच्या कृती किंवा व्यवहार वगैरेंचा अभ्यास केला जातो. सर्वेक्षणाद्वारे कंपनीस आपल्या वस्तूच्या मागणीचा पूर्वअंदाज करणे शक्य होते. अशाच प्रकारे संशोधनाच्या वेगवेगळ्या पद्धतींच्या आधारे संशोधन समस्यांना उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो. उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने संशोधन अतिशय महत्वाचे आहे.

## २. उद्योग-व्यवसायाच्या संधी व संशोधन:

विज्ञान व तंत्रज्ञान यात सातत्याने प्रगती होत आहे. संशोधनाच्या माध्यमातून होणाऱ्या या प्रगतीतून नवनवीन शोध लागत आहेत. अनेक उद्योग-व्यवसायाचे मूळ अशा शोधतच असते. संशोधनामुळे नवीन वस्तूंचा शोध लागतो तेव्हा समाजातील लोकांना त्या उपलब्ध होण्यासाठी व्यापारी तत्वावर वस्तूंचे उत्पादन होणे आवश्यक असते. अशा वस्तूंचे उत्पादन व वितरण यातून नवनवीन उद्योग व्यवसाय सुरु होतात. मात्र, ते सुरु करण्यापूर्वी विशिष्ट वस्तूंचे उत्पादन व्यापारी तत्त्वावर करून त्याचे वितरण करणे फायदेशीर होईल का याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक असते.



ISSN No-2249-9792

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

लोकांना जाणवणाऱ्या समस्येतून, गरजेतून नवनवीन व्यवसाय निर्माण होतात पर्यटन व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, प्रकाशन व्यवसाय असे अनेक व्यवसाय लोकांच्या गरजेतून निर्माण झालेले आहेत. लोकांना जाणवणाऱ्या समस्यांची व त्यांच्या अपेक्षांची माहिती करून घेणे हे उद्योग-व्यवसायाच्या शक्यतेचा शोध घेण्यासाठी आवश्यक असते. प्राथमिक निरीक्षणावरून या समस्यांसंबंधी माहिती होत असते. परंतू केवळ अशा माहितीच्या आधारे उद्योग किंवा व्यवसाय सुरु करता येत नाही. उद्योग-व्यवसाय सुरु करण्यापूर्वी उद्योजकाला आपण उत्पादित करणार असलेल्या वस्तूला ग्राहकांकडून मागणी येईल का, याचा विचार करावा लागतो. अनेकदा काही वस्तू ग्राहकांच्या दृष्टीने उपयोगाच्या असतात. त्यांच्यात उपयोगिताही असते. परंतू ग्राहकांना त्या वस्तुची गरज भासत नाही. अशा वस्तूंची उपयोगिता लोकांच्या लक्षात आणून देऊन मागणी निर्माण करणे शक्य असते. मात्र, अशा शक्यतेचा शास्त्रीय पद्धतीने अंदाज घ्यावा लागतो. त्यासाठी संशोधन उपयुक्त ठरते.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, तांत्रिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रात काळानुरूप बदल होत असतात. बदलत्या परिस्थितीला अनुसरून उद्योग-व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होत असतात. उद्योजकाला अशा संधीचा शोध घ्यावा लागतो. त्यासाठी अशा बदलाची माहिती घेणे व त्या माहितीचे विश्लेषण करणे उद्योजकाला आवश्यक ठरते; तसेच काळानुरूप उद्योग-व्यवसायाच्या स्वरुपात आवश्यक ते बदलही करावे लागतात.

नाविन्याचा सातत्याने शोध घेणे हे उद्योजकाचे महत्वपूर्ण कार्य मानले जाते. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जोसेफ शुंपीटरच्या मते नावीन्याचा सातत्याने शोध घेणाऱ्या संयोजकाला नफा मिळतो. आधूनिक उत्पादनपद्धती, नवीन कच्चा माल, वस्तुत नावीन्यपूर्ण बदल, नवीन बाजारपेठ, जाहिरात, व्यवस्थापनात सुधारणा, अशा नावीन्यपूर्ण गोष्टीचा शोध घ्यावा लागतो. नावीन्याचा शोध घेऊन त्याचा उत्पादन कार्यात वापर केल्याने कमीत कमी खर्चात गुणवत्तापूर्ण वस्तूचे उत्पादन शक्य होते. त्यातून वस्तूंची मागणी व नफ्याचे प्रमाण यात वाढ होऊन उद्योग-व्यवसायाची प्रगती होते. नावीन्याचा शोध घेण्याच्या प्रक्रियेत संशोधनाची मदत होते. त्यामुळेच अनेक उद्योगात संशोधन व विकास विभाग कार्यरत असुन, त्यामार्फत सातत्याने संशोधन कार्य चालू आहे. भारतात सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांनी आपल्या तंत्रज्ञानविषयक गरजा भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणत संशोधन आणि विकास प्रयोगशाळांची स्थापना केलेली आहे. तसेच देशातील राष्ट्रीय प्रयोगशाळा व विद्यापीठे यातून विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन चालू आहे.



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed,Dist-Pune.

## ३. उद्योग-व्यवसायाची उभारणी व संशोधन:

उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने संशोधनाचे महत्व केवळ त्यातून नवनवीन संधी उपलब्ध होतात एवढ्यापुरतेच मर्यादित नाही, तर उद्योग-व्यवसायाच्या उभारणीसाठीही त्याची मदत होते. उद्योग-व्यवसायात गुंतवणूक करताना उद्योजक ती फायदेशीर ठरेल की नाही याचा अंदाज घेत असतो. शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून असा अंदाज घेतला जातो. उद्योजकाला उद्योगाची किंवा व्यवसायाची उभारणी करताना अनेक निर्णय घ्यावे लागतात. उत्पादन प्रकार, उद्योगाची स्थान-निश्चिती, कच्च्या मालाची निवड, भांडवल उभारणी, नोकरभरती, उत्पादन पद्धती व तंत्राची निवड, वितरण व्यवस्था अशा अनेक बाबतीत निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय घेत असताना कमीतकमी उत्पादन खर्चात उत्पादन करून महत्तम नफा मिळविण्याचे उद्दिष्ट केंद्रस्थानी असते. साहजिकच त्यासाठी शास्त्रीय पद्धतीने या विविध बाबींसंबंधी माहिती मिळवून उद्योजकाला उत्पादन व वितरणासंबंधी निर्णय घ्यावे लागतात.

उद्योजकाला वस्तूचे उत्पादन सुरु करण्यापूर्वी आपल्या उत्पादनाला किती मागणी राहील याचा आगाऊ अंदाज घ्यावा लागतो. तसेच उत्पादनाला सुरवात झाल्यानंतरही सातत्याने मागणीचा पूर्वअंदाज करणे आवश्यक असते. भविष्यकाळात मागणीत होणाऱ्या बदलानुसार उत्पादनात बदल करता यावा यासाठी वर्तमानकाळातच भावी मागणीसंबंधी अंदाज करणे महत्वाचे असते. मागणीत वाढ झाल्यानंतर ताबडतोब उत्पादनात वाढ करणे अवघड असते. भावी मागणीतील वाढीसंबंधी अगोदर अंदाज घेतल्यास विस्ताराची योजना आखणे सोपे जाते.

## ४. उद्योग-व्यवसाय विस्तार व संशोधन:

उद्योग-व्यवसायाच्या संधी शोधणे, त्याची सुरवात करणे याबरोबरच विस्तार घडवून आणणे यासाठी संशोधनाची मदत होते. उत्पादनाला असलेल्या मागणीवरच उद्योग-व्यवसायचा आकार अवलंबून असतो. साहजिकच उद्योग-व्यवसायाचा विस्तार होऊन प्रगती होण्यासाठी मागणीत वाढ होणे आवश्यक असते. लोकांच्या उत्पन्नात वाढ, लोकसंख्यावाढ यांसारख्या कारणांमुळे उत्पादनाची मागणी वाढण्याची शक्यता असते. यातून विस्ताराच्या संधी उपलब्ध होतात. मात्र, अशा संधी मर्यादित असतात.

आपल्या वस्तूविषयी ग्राहकांच्या मनात आवड निर्माण करण्यासाठी, त्याला ते विशिष्ट उत्पादन विकत घेणे कसे गरजेचे आहे, हे पटवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan Tal-Khed Dist-Pune.

लागतात. वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिन्या व इतर माध्यमांद्वारे वेगवेगळ्या उत्पादनांच्या ज्या जाहिराती केल्या जातात त्यामागे ग्राहकांना आपल्या उत्पादनाची माहिती देणे एवढाच उद्देश नसतो. उत्पादनासंबंधी ग्राहकांच्या मनात आवड निर्माण करणे हाही हेतू यामागे असतो. आजच्या स्पर्धेच्या युगात इतरांपेक्षा आपली वस्तू कशी दर्जेदार आहे, हे पटवून देण्याचा प्रत्येक उत्पादकाचा प्रयत्न असतो. जाहिरातीसाठी कोणत्या माध्यमाची निवड करावी, जाहिरातीवर किती खर्च करावा वगैरे बाबतीत निर्णय घ्यावे लागतात. आपल्या उत्पादनाला असलेल्या मागणीत वाढ करण्यासाठी बाजारपेठांचा विस्तार घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी नवीन बाजारपेठांचा शोध घेणे आवश्यक असते. देशांतर्गत मागणीला विदेशी मागणीची जोड मिळण्यासाठी प्रयत्न करता येतात.

अशा प्रकारे उद्योग-व्यवसायाच्या संधीची उपलब्धता, उद्योग-व्यवसायाची उभारणी, विस्तार योजना वगैरे बाबतीत संशोधनाची अतिशय मदत होते. अलीकडील काळात नोकरीच्या संधी मर्यादित होत आहेत. त्यामुळे तरुणांनी स्वयंरोजगाराकडे वळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना संशोधन कार्यपद्धतीची ओळख व्हायला हवी सद्यःस्थितीतील पदवी स्तरावरील अभ्यासक्रमात यास फारसे स्थान नाही.

## ५. उद्योग-व्यवसायातील समस्या व संशोधन:

उद्योग-व्यवसायाचा शोध, उभारणी आणि विस्ताराच्या बाबतीत जसे संशोधन उपयुक्त आहे, त्याचप्रमाणे बदलत्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या बाबतीतही ते उपयुक्त आहे. अर्थव्यवस्थेत जेव्हा मंदी येते तेव्हा उद्योग-व्यवसायावर त्याचा परिणाम होतो. तसेच तंत्रज्ञानातील बदलाचाही उद्योग-व्यवसायावर परिणाम होतो. लोकांच्या सवयी व अभिरुचीतील बदलाचाही उद्योग-व्यवसायावर परिणाम होतो. आर्थिक धोरणातील बदल, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती या व अशा अनेक बाबींमुळे उद्योग-व्यवसायापुढे समस्या निर्माण होतात. समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या समस्येचे योग्य निदान होणे आवश्यक असते. समस्येचे योग्य निदान करण्याच्या आणि त्या दूर करण्यासाठी उपाय ठरविण्याच्या बाबतीत संशोधनाची मदत होते.

## सारांश:

संशोधन ही गुंतागुंताची प्रक्रिया आहे. संशोधनाच्या माध्यमातून नवीन ज्ञान मिळविण्याचा सुव्यवस्थित प्रयत्न केला जातो. आर्थिक, सामाजिक, राजकीय, व्यावसायिक अशा सर्वच



Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

क्षेत्रात संशोधनाचा उपयोग होतो. उद्योग-व्यवसायाचा शोध, उभारणी आणि विस्ताराच्या बाबतीत संशोधन उपयुक्त आहे. तसेच उद्योग-व्यवसायापुढे वेळोवेळी ज्या समस्या निर्माण होतात त्या समस्येचे योग्य निदान करण्याच्या व त्या दूर करण्यासाठी उपाय ठरविण्याच्या बाबतीतही संशोधनाची मदत होते.

संदर्भ:


1. Kothari C.R.(2009), Research Methodology Methods and Techniques, New Age International Publishers, New Delhi.
2. Goode and Hatt (2006), Methods in Social Research, Surjeet Publications, Delhi.
3. Panneerselvam R. (2009), Research Methodology, PHL Learning Private Limited, New Delhi.
4. Ahuja H.L. (2004), Modern Economics, S.Chand & Company Ltd., New Delhi.
5. Biyani Pramod and Rasal R.A. (2003),Research Methodology, Sharp Publishers, Pune.
6. रसाळ राजेंद्र अ. भारतीय अर्थव्यवस्था(२०१६) सक्सेस पब्लीकेशन्स, पुणे.


Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.



Vol. IX Special Issue No. 1 February 2020 ISSN No-2249-9792